-: प्रेस नोट :- दि. १३/२/२०१९

फिर्यादी, त्यांचा भाऊ व मित्र यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाच्या तपासात सहकार्य करण्याकरीता रु. ८०,०००/- रकमेची लाच स्विकारल्याने मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ११/२०१९ |
| कलम | ७ भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारीत २०१८) |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | दत्तात्रय गोविंद चौधरी, वय ५० वर्षे, पोलीस निरीक्षक, देवनार पोलीस ठाणे, मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ३,००,०००/- |
| तडजोडीअंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम | रु. २,५०,०००/- |
| पहिला हप्ता म्हणून स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ८०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी, त्यांचा भाऊ व मित्र यांचे विरुध्द देवनार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास आलोसे हे करीत आहेत. गुन्हयामध्ये फिर्यादींसह सर्व आरोपींना अंतरीम जामीन मंजुर झालेला असून, जामीनाची अंतिम सुनावणी बाकी आहे. आरोपीताना जामीन मिळवून देण्याकरीता तसेच त्यांचे विरुध्दच्या दाखल गुन्हयामध्ये सहकार्य करण्याकरीता, आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे रु. ३,००,०००/- रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयास दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी रु. ३,०००००/- रक्कमेच्या लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती रु. २,५०,०००/- रक्कमेची लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे रचण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवकास फिर्यादी यांचेकडून, लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हप्ता रु. ८०,०००/- रोख रक्कमेची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ३०.**
**टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८.**
**वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,**
**ईमेल - addcpacbmumbai@mahapolice.gov.in,**
**फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB.**
**मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net**
**व्हॉट्स ॲप क्रमांक - ९९३०९९७७००**

**( एम.एन.मुगुटराव )**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.**

Scanned by CamScanner